CMYK

बीड । रविवार

२३.०२.२०२५

वर्षे : ४ अंक : ३१७

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955








# संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये संशयित पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी करा : आ. सुरेश धस

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मासाजोगच्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित पोलीस अधिकाऱ्यांना आरोपी करण्याची मागणी हे गावकरी आणि नागरिकांचे आहे त्यामुळे त्या संशयित पोलीस अधिकाऱ्यांना आरोपी करण्यात यावे अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केज येथील पोलीस ठाण्यामध्ये जाऊन पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली.

शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी आमदार सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबची भेट घेतल्यानंतर केज येथील पोलीस ठाण्यात हजर झाले त्यांनी प्रभारी पोलीस पोलिस अधिकारी वैभव पाटील यांची भेट घेतली पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांनी अशी मागणी केली की संतोष हत्या प्रकरणातील आरोपीच संपर्क असलेले संशयित पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि तत्काळ पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना संतोष देशमुख हत्याप्रकरणी या दोन पोलीस अधिकाऱ्यांना सह आरोपी म्हणून गुन्हा दाखल करावा अशी नागरिकांची मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी कृष्णा आंधळे याला तातडीने अटक करावी, अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली आहे. मस्साजोग येथे त्यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन या घटनेबाबत सखोल चर्चा केली. तसेच, आरोपीला पळवून लावण्यात ज्यांचा हात आहे, अशा सर्वांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

ग्रामस्थांनी मांडलेल्या आठ प्रमुख मागण्या सरकारने मान्य न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. पोलिस यंत्रणेत मोठ्या बदलांची गरज असल्याचे सांगत, केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली करून काहीही साध्य होणार नाही, तर दोषी पोलिस कर्मचाऱ्यांवरही कठोर कारवाई व्हावी, बीडच्या ओर पोलीस अधीक्षकपदी पंकज कुमावत यांची नियुक्ती करावी अशी मागणी आमदार धस यांनी केली. तसेच, या प्रकरणातील आरोपींना तुरुंगात व्हीआयपी सुविधा दिल्या जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आरोपींना मदत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांची चौकशी करावी, महाजन आणि राजेश पाटील यांना सहआरोपी म्हणून कारवाई करावी, तसेच एसआयटीमध्ये सायबर तज्ज्ञांचा समावेश करावा,

▶▶ उर्वरित पान २ वर



# बीड जिल्ह्यात युवासेनेचा युवा विजय दौरा

## युवासैनिकांणी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - रविराज बडे, सुजित शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात अलिकडेच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा तब्बल साठ जांगावर विजय मिळवला असुन या पार्श्वभुमिवर युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांणी युवासेनेच्या माध्यमातुन हा विजय साजरा करत संघटना बांधणी वर लक्ष घातल्याचे दिसून येत आहे, याचाच भाग म्हणून संपुर्ण राज्य भर युवा विजय दौरा आयोजित करण्यात आला आहे याचाच दुसरा टप्पा हा बिड जिल्ह्यात पार पडत असुन या दौर्याच्या माध्यमातुन संघटनेला मजबुतिने उभा करण्यात मोठी मदत प्राप्त होणार असुन जुण्या नव्या युवासेना पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन युवासेना जिल्हाध्यक्ष रविराज बडे व युवासेना जिल्हाध्यक्ष सुजित शिंदे यांनी केले असुन सदरील युवासेना विजयी दौरा बीड चा दुसरा टप्पा हा दि.२३/०२/२०२५ रोजी परळी येथून सुरु होणार आहे .

# वाळूखाली दबून पाच जणांचा मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील बांधकाम मजुराच्या पत्र्याच्या निवाऱ्यावर मालमोटारीतील वाळू उलथवल्यामुळे दबून पाच जणांचा मृत्यू झाल्याची घटना जाफराबाद तालुक्यातील पासोडी या गावी घडली. पासोडी येथे पुलाचे बांधकाम सुरू होते. सात जण या पत्र्याच्या निवाऱ्यामध्ये झोपले होते. पहाटे वाळूचा ट्रक पत्र्याच्या निवाऱ्यावर रिकामा केल्यामुळे

▶▶ उर्वरित पान २ वर



# दहावीच्या पेपर फुटी प्रकरणात मोठी कारवाई, पोलिसांनी ठोकल्या तीन जणांना बेड्या



**जालना । प्रतिनिधी**

जालन्यातील बदनापूरच्या परीक्षा केंद्रावर मराठीचा पेपर फुटल्याचा (डडउ एुरा झरशिी डशरज्ञ) प्रकार शुक्रवारी (दि. २१) उघडकीस आला. एकीकडे शिक्षणमंत्री परीक्षा केंद्रावर भेट देऊन कॉपीमुक्त अभियानाची पाहणी करत आहेत. तर दुसरीकडे दहावीच्या परीक्षेचा पहिलाच पेपर फुटल्याने शिक्षण वर्तुळात एकच खळबळ उडाली. या प्रकरणात शिक्षण अधिकारी मंगला धूपे यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# जरांगेंच्या ताफ्यातील गाडीची दुचाकीला धडक

## घरात घुसून महिलेला शिवीगाळ करत मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील हे काल बीडच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी मस्साजोगला जाऊन सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यासोबतच त्यांनी ग्रामस्थांसोबत चर्चा देखील केली. सये सोयऱ्यांचा निर्णय येत्या कॅबिनेटमध्ये होणार असल्याचा दावाही जरांगे यांनी केला. जरांगे हे बीडच्या दौऱ्यावर असताना एक घटना घडली आणि त्यानंतर आता गुन्हा देखील दाखल झाला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यात असलेल्या गंगाधर काळकुटे यांच्या गाडीने एका दुचाकीला धडक दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली.




जरांगेंच्या ताफ्यात गंगाधर काळकुटे यांची गाडी होती आणि या गाडीने एका दुचाकीला धडक दिली. ही घटना पाटोदा तालुक्यातील कचारवाडी गावानजीक घडली होती. यात दुचाकीवरील एक महिला आणि तिचा मुलगा धडकेनंतर खाली पडले. यावेळी शाब्दिक चकमक झाली आणि वाद तिथेच थांबला. मात्र, रात्री त्याच महिलेच्या घरात घुसून

▶▶ उर्वरित पान २ वर



*आमदार सुरेश अण्णा धस हे घाटसावळी येथे थांबताच चाहत्यांनी बीड - परळी रस्ता ब्लॉक होईपर्यंत केली गर्दी केली. शनिवारी परळी वरून बीड कडे जात असताना लोकनेते आ सुरेश अण्णा धस यांनी धनंजय गुंदेकर यांची भेट घेतली मौजे घाटसावळी येथे सायंकाळच्या सुमारास चहा घेत परिसरातील नागरिकांशी संवाद साधला. लवकरच बीड येथे जिल्ह्यातील जनतेसाठी मदत / संपर्क कार्यालय सुरू करण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.*






# पवित्र रमजानच्या अनुषंगाने मुस्लिम बहुल भागात सोयी-सुविधा सुरळीत करा



## आ.संदीप क्षीरसागरांकडून नगरपरिषदेला सूचना

**बीड । प्रतिनिधी**

पुढील महिन्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्येच पवित्र रमजान महिना सुरू होत आहे. या अनुषंगाने बीड शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, स्वच्छतेची कामे लवकरात लवकर करून घ्या. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. यावर्षी पवित्र असलेला रमजान महिना मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच येणार आहे. पवित्र रमजान महिन्याच्या आगमनानंतर मुस्लिम बांधव पूर्ण महिनाभर कडक उपवास आणि अल्लाह ची उपासना करतात. त्यामुळे विविध सोयी सुविधा सुरळीतपणे उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यामुळे शहरातील सर्वच प्रभागातील मुस्लिम बहुल भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत करणे, विद्युत जोडणी पूर्ण करणे तसेच परिपूर्ण स्वरूपात स्वच्छतेची कामे करणे इत्यादी कामे प्राधान्याने,

▶▶ उर्वरित पान २ वर

# ग्रामीण रुग्णालयला जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था, रस्तात खड्डे कि खड्ड्यात रस्ते ?

**विश्वास शिनगारे**

अनेक वर्षापासून धारूर रुग्णालयाला जाणाऱ्या रस्त्यावर जागो जागी मोठमोठे खड्डे पडून या रस्ता वरुन रुग्णालयाला जाण्यासाठी तेथील रहिवाशी व रुग्णाची दुखी ठरत आहे त्यामुळे रुग्णांचे मोठे हाल होत आहेत तर तेथील रहिवासी या रस्त्यामुळे वैतागून गेले आहेत रुग्णालयाला जाणाऱ्या हनुमान मंदिर ते ग्रामीण रुग्णालय पर्यंत रस्ता तात्काळ करावा यासाठी येथील नागरिक अनेक नेत्याला भेटले आहेत व अनेक वेळा निवेदन ही दिले पण रस्ता न झाल्याने नागरिकांतून मधुन संताप व्यक्त होत आहे.

धारूर ग्रामीण रुग्णालय मध्ये एक ना अनेक समस्या आहेत ग्रामीण रुग्णालयामध्ये पुरेसा स्टाफ नसती अनेक अडचणींना रुग्णांना व रुग्णांना नातेवाईकांना सामोरे जावे लागते डॉक्टर वेळेवर मिळत नाहीत, रुग्णवाहिकासाठी पेशंटला वाट पाहावी लागते अशा अनेक अडचणीचा सामना रुग्ण, रुग्णांच्या नातेवाईकांना सहन करावा लागतो तसेच प्रामुख्याने गेली अनेक वर्षापासून ग्रामीण रुग्णालयाला जाणाऱ्या रस्ता खड्डेमय झाला आहे रस्त्याची अंत्यत दुरावस्था झाली असून या रस्त्याने दवाखान्यात येताना मरण बरे, अशा लोकांमधुन व्यक्त होत आहेत. कारण या रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली असून कित्तेक वर्षांपासून रस्ता खराब झालेला असताना ही ईकडे कोणीही लक्ष देत नाही. खड्डे एवढे पडले आहेत की रात्री अपरात्री या रस्त्याने प्रवास करताना नागरिक व रुग्णांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. या रस्त्या बाबत स्थानिकच्या लोकांनी अनेकदा तक्रारी येथील नागरिक अनेक नेत्याला भेटले आहेत व अनेक वेळा निवेदन ही दिले केल्या परंतू रस्त्याच्या दुरावस्थेकडे कोणत्याही राजकीय नेत्याने साधे ढुंकणही

▶▶ उर्वरित पान २ वर



CMYK

# .... तरच मातृभाषा संपन्न होईल !

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## मकरंद अनासपुरे 'छावा' पाहिल्यावर म्हणाले, इतिहासाची मोडतोड

विकी कौशलची मुख्य भूमिका असलेला 'छावा' हा चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. एका आठवड्यापूर्वी रिलीज झालेल्या या चित्रपटाने आतापर्यंत भारतात २०० कोटींहून आणि जगभरात ३०० कोटींहून जास्त कमाई केली आहे. या चित्रपटाची सगळीकडे चर्चा आहे. हा चित्रपट मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी कुटुंबाबरोबर पाहिला. चित्रपट पाहिल्यानंतर ते काय म्हणालेत, जाणून घेऊयात.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीचे औचित्य साधून मकरंद अनासपुरे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा चित्रपट कुटुंबाबरोबर पाहिला. त्यांनी चित्रपटातील कलाकारांचे कौतुक केले आहे. मकरंद अनासपुरे चित्रपट पाहिल्यानंतर माध्यमांशी बोलताना 'छावा' चित्रपटाबद्दल म्हणाले, अलीकडच्या काळात इंग्रजी शाळांचं पेव फुटलेलं असताना आपल्या संस्कृतीविषयी, आपल्या मातीविषयी, आपल्या वीरांविषयी सगळ्यांना माहिती असणं महत्त्वाचं आहे. महाराष्ट्रातील तमाम आई-वडिलांना माझी कळकळीची विनंती आहे की आपल्या मुलांना हा सिनेमा आवर्जून दाखवा. मी गेल्या काही दिवसात वेगवेगळ्या बातम्या ऐकतो आहे. काही हिंदी भाषिक मित्रांच्या प्रतिक्रियाही ऐकल्या की आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास शाळेत का शिकवला गेला नाही? मला असं वाटतं की, सध्याच्या काळात समाजात जातीपाती विसरून एकत्र येण्याची गरज आहे आणि त्यासाठी हा चित्रपटही योग्य भुमिका बजावेल याची मला खात्री आहे. पुढे ते म्हणाले, आपण सजगतेनं, सवंदेनशिलतेनं हा चित्रपट पाहणं, तो समजून घेणं, इतिहासाची मोडतोड न करता, त्याचं विकृतीकरण न करता, त्याविषयी विचित्र भाष्य न करता आपण सर्वांचा अभिमान, आपण धर्मरक्षक संभाजी महाराज म्हणतो, धर्मासाठी ज्यांनी प्राण त्यागले, त्यांचा धगधगता इतिहास या चित्रपटाने मांडला आहे, त्याबद्दल मी दिग्दर्शक उतेकर यांचे अभिनंदन करतो. विकी कौशलने मुख्य भूमिका साकारली आहे. त्याचबरोबर रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना व सर्व मराठी मातब्बर मंडळींचे मी अभिनंदन करतो.जातीयवादाचा उल्लेख करत मरकंद अनासपुरे म्हणाले, सध्या महाराष्ट्रात जातीय वातावरण कलुषित करण्याचं जे काम होतंय, त्यामध्ये हा सिनेमा निश्चितच एक उत्तम मलमाचं काम करेल, याची मला खात्री आहे. आपला हा इतिहास जपला पाहिजे आणि सोबतच हा इतिहास आपण आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे. मध्यंतरी कोल्हापूरच्या संभाजी छत्रपतींनी जी सूचना केली फार महत्त्वाची वाटली.

पान १ वरून पुढे...

### संतोष देशमुख हत्या...

अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या मागण्या सादर करून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही धस यांनी स्पष्ट केले.

### वाळूखाली दबून...

पत्रे दबले. त्याखाली सात जण दबले गेले. यातील दोन मजुरांना वाचविण्यात आले. यामध्ये १३ वर्षाच्या मुलीचा व महिलेचा समावेश आहे. मृतांची नावे अद्याप समजू शकली नाहीत. हे मजूर जळगाव आणि संभाजीनगरचे असल्याचे सांगण्यात येत आहे. ही घटना पहाटे साडेचार वाचण्याच्या सुमारास घडली. पुलाच्या कामासाठी गेलेल्या मजूरांच्या पत्र्याच्या शेडवर गाढ झोपेत असताना वाळूच्या टिप्परमधून वाळू रिकामी झाली. ही घटना कळताच पोलीसांसह स्थानिक ग्रामस्थ पोहचले. वाळू बाजूला करुन दोघांना वाचविण्यात यश आले. जालन्यातील जाफराबाद तालुक्यातील पासोडी चांडोळ रस्त्यावरील पुलाचे काम सुरू असताना ही घटना घडली. अपघात घडल्यानंतर स्थानिक रहिवाशांनी घटनास्थळी मोठी मदत केल्यामुळे दोघींना वाचविण्यात यश आले आहे. पोलिसांनी पंचानाम सुरू केला आहे.

### दहावीच्या पेपर फुटी...

फिर्यादीवरून बदनापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात सीएससी केंद्र चालकासह एका इंग्रजी माध्यमातील शाळेच्या कर्मचार्याचा समावेश आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, गुरुवारी दहावी बोर्ड परीक्षा सुरू झाल्या असून पहिल्याच दिवशी मराठीचा पेपर फुटला. मराठीचा पेपर सुरू सकाळी ११ वाजता झाल्यानंतर काही वेळातच बदनापूर शहरातील सीएसी केंद्रावर उत्तर पत्रिकेची झेरॉक्स मिळत असल्याचे समोर आले आहे. मराठीचा पेपर सुरू झाल्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटातच प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या बाहेर आल्याने शहरातील झेरॉक्स सेंटरमधून उत्तरपत्रिकांच्या प्रिंट काढून विद्यार्थ्यांना पुरवल्या जात होत्या. तर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्यासाठी तरुणांची हुल्लडबाजी देखील देखील दिसून आली. यानंतर शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांच्या फिर्यादीवरून बदनापूर पोलीस ठाण्यामध्ये रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिक्षण मंडळाच्या आदेशानंतर जालना जिल्हा प्रशासनाने प्रकरणाचा तपास करत कारवाई केली आहे. बदनापूर येथील परीक्षा केंद्रावर दहावीच्या मराठी पेपरच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न हस्तलिखित करून व्हायरल केल्याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे. बदनापूर येथील ज्या सीएससी केंद्रावरून झेरॉक्स केल्या जात होत्या. त्या सीएससी केंद्र चालकासह, प्रश्नपत्रिकेतील प्रश्न व्हायरल करणाऱ्या एका इंग्रजी शाळेच्या कर्मचाऱ्याला देखील पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान, पेपरफुटीवर राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटलंय की, काही ठिकाणी कॉपी झाली. कॉपी पुरविण्याचे प्रकार समोर आले, तशा चित्रफितही प्रसार माध्यमातून पुढे आल्या. त्याची निश्चितपणे गंभीर दखल शासन स्तरावर घेतली आहे. यापूर्वी ज्या केंद्रावर कॉपी झाली ते केंद्र रद्द करण्यात आले आहे. त्याच बरोबर यापूर्वी ज्या केंद्रावर कॉपी झाली आहे. त्या केंद्रावरील प्रशासन देखील बदलण्यात आले आहे. कॉपी पुरवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. ते केंद्र दहावीच्या परिक्षेसाठी रद्द केले जाईल, असे दादा भुसे यांनी म्हटले.

### जरांगेंच्या ताफ्यातील...

आमच्या ताफ्यातील गाडीला का अडवलेस म्हणून तिला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली.

हेच नाही तर महिलेला जीवे मारण्याची धमकी देखील देण्यात आली. ही घटना बीडच्या संभाजीनगर भागात घडली. या घटनेनंतर महिलेने पोलिसांत धाव घेतली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तीन अनोळखी व्यक्तींच्या विरोधात बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. दरम्यान आता हे तीन हल्लेखोर कोण होते? याचा शोध पोलीस घेत आहेत. बीड जिल्हा काही दिवसांपासून सतत चर्चेत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर अनेक गंभीर आरोप केली जात आहेत. पोलिस प्रशासन देखील अलर्ट मोडवर आहे. काही दिवसांपूर्वीच खासदार सुप्रिया सुळे यांनी संतोष देशमुखांच्या कुटुंबियांची भेट घेतली. आमदार सुरेश धस हे धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करताना दिसत आहेत. हेच नाही तर सातत्याने धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. मनोज जरांगे पाटील हे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबद्दल बोलताना दिसले आहेत.

### पवित्र रमजानच्या...

पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वीच करून घ्यावेत अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत.

### ग्रामीण रुग्णालयला...

पाहीले नाही. यामुळे या परिसरातील नागरीकांना प्रश्न पडला आहे, या रस्त्याला कोणी वाली आहे, की नाही? असा थेट सवाल येथील नागरीक विचारत आहेत.

पान ४ वरून पुढे...

### उदरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या...

जमलेले बघे लोक १०,२०,५० रूपये द्यायचे परंतु आता खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले आहेत. कधी २०० तर कधी नशिबाने ५०० रुपये मिळतात. या खेळातुन पुर्वी चांगली बिदागी मिळत होती व यावर कुटुंबाची उपजीविका चांगली चालत होती.परंतु आजकाल खेळ पाहण्यासाठी लोकांकडे वेळ नाही.गावच्या वेशी जवळ अथवा रोडलगत खेळ सुरू केला तर लोक नजर टाकुन पुढे निघून जातात. त्यामुळे सध्या उपजिविकेचा व्यवसाय अडचणीत आल्याची खंत नागपुरचे रामलाल यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी लिंबागणेश येथे खेळ सादर केल्यानंतर संवाद साधताना बोलावून दाखवली.

### तलवाडा येथील ड्राव्हिंग....

त्यांच्या तब्येतीने साथ न दिल्यामुळे राहत्या घरी चार वाजता अखेरचा श्वास त्यांनी घेतला. तत्पश्चात संध्याकाळी ७ वाजता हिंदु श्मशान भूमीत अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात दोन मुले दोन भाऊ पुतणे भाऊजाई नातवंड आसा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने तलवाडा व तलवाडा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे मोरे परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक मराठवाडा परिवार सहभागी आहे.

### प्रगत तंत्रज्ञानाचे...

वैज्ञानिक सल्लागार समिती बैठकीचे सदस्य प्रगतशील शेतकरी श्री. सखाराम कानगुडे, श्री. मुरलीधर घोडके, श्री. अर्जुन फलके, श्री. रामेश्वर चांडक यांची देखील उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाच्या सुरुवातीस केव्हीके खामगाव येथील कार्यक्रम समन्वयक डॉ. हनुमान गरुड यांनी प्रास्ताविक करून केव्हीकेच्या मागील दोन वर्षाच्या केलेल्या विविध विस्तार कार्याच्या अहवालाचे सादरीकरण केले. तदनंतर पशुसंवर्धन विभागामार्फत शेतीस जोडधंदा- आधुनिक शेळी व कुक्कुटपालन या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. त्यानंतर केव्हीकेच्या सर्वच विषय विशेषज्ञांनी विषयनिहाय आपल्या कार्याचा अहवाल सादर केला. त्यानंतर डॉ. गिरधारी वाघमारे यांनी आपल्या मनोगतातून सल्ला दिला की कृषी विद्यापीठ, कृषी विभाग व जिल्ह्यातील सर्वच कृषी संलग्नित संस्था शेतकरी हा केंद्रस्थानी ठेवून विस्तार कार्य करावे. बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अवलोकन करून त्यानुसार पुढील कार्य अहवाल तयार करावा. तसेच सर्व विभागांसोबत प्रभावीपणे विस्तार कार्य करावे. शेतकरी बांधवांनी देखील विद्यापीठाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा. केव्हीके द्वारे घेण्यात आलेल्या विविध चाचण्यांचे निष्कर्ष इतर शेतकरी बांधवांना सांगावेत व तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात प्रोत्साहित करावे. भविष्यात देखील शेतकऱ्यांच्या गरजेनुसार विविध प्रशिक्षण कार्यक्रम व इतर विस्तार कार्यक्रमांचे आयोजन केव्हीके मार्फत करण्यात यावे. यावेळी उपस्थित प्रगतशील शेतकरी, महाबीज बीड प्रतिनिधी, धानचे जिल्हा समन्वयक नितीन खडके, रिलायन्स फौंडेशन, ॲग्रोवन प्रतिनिधी, पाणी फौंडेशन, कृषि विभागातील अधिकारी व कृषि उद्योजकांनी प्रत्याभरणे दिली व त्यानुसार सर्व विभागांनी कार्य करावे असे मत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भैयासाहेब गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. तुकेश सुरपाम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. किशोर जगताप, श्री गजेंद्र आढावे, श्री. दत्तप्रसाद वीर, श्री विजय चांदणे, सुधाकर काटे, उमेश वारे आणि केव्हीकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

### लोकशाही पत्रकार संघ...

तालुका अध्यक्ष महिला आघाडी पदी जयश्री माने यांची निवड संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण यांच्या आदेशानुसार केली. परळी तालुका अध्यक्ष पदी जयश्री माने यांची निवड केल्या बद्दल माने मॅडम म्हणाल्या की तालुक्यातील प्रत्येक गावात पत्रकार असला पाहिजे. त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी लोकशाही पत्रकार संघा मार्फत मी प्रयत्न करणार आहे. जयश्री माने यांचा सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य , संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष,शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष,नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले - सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

### जि.प.प्राथमिक शाळा...

श्री.अनिल खोसे चेअरमन, श्री.प्रशांत बाबासाहेब खोसे, श्री.रामहरी भागडे, तसेच प्रतिष्ठित मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या कार्यक्रमात महाराष्ट्र व भारतीय संस्कृतीचे समग्र दर्शन घडवणारा असा हा देखना सांस्कृतिक सोहळा होता. यामध्ये शिवजयंती निमित्त ३० विद्यार्थ्यांचा सहभाग असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्ण इतिहासाला उजाळा देणारा जिवंत देखावा प्रेक्षकाच्या खास पसंती पडला. तसेच राजमाता जिजाऊ, छत्रपती शंभुराजे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, म.ज्योतिबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले ,वस्ताद लहुजी साळवे या समाज सुधारकांच्या कार्याला मानवंदना देणारा ॲक्ट प्रेक्षकांची मने जिंकून गेला..याबरोबर शेतकरी गीत, टिपरी नृत्य, अंधश्रद्धा निर्मूलन, गीतगायन,कोळीगीत, गोंधळ,वाघ्या मुरळी,देशभक्तीपर गीत,लावणी ,भारुड यावर इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्याचे सादरीकरण केले. तसेच प्रत्येक शेतकरी बाबाला आत्महत्या करू नका आम्ही शिकून खूप मोठे होणार असा विद्यार्थ्यां मार्फत संदेश देणारी नाटिका विशेष प्रेक्षकांच्या लक्षात राहिली.. याबरोबरच धमाल विनोदी नाटिका व या नाटिकामधील विद्यार्थी कलाकार भाव खाऊन गेले. या कार्यक्रमासाठी पालक, शिक्षणप्रेमी नागरिक, पंचक्रोशीतील महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.सर्वांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. लक्ष्मण क्षीरसागर मु.अ. जि.प.प्रा.शा. तांदळवाडी घाट, यांनी केले तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री.राजा काटे सर व श्री. अनिलजी खोसे सर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी अतिशय मेहनत घेतली यामध्ये श्री. महेश फसले सर श्री. विलास खोसे सर श्रीमती सुनिता शिंदे मॅडम, श्रीमती प्रिया यमपुरे मॅडम, श्री.काटवटे नाना, श्री.राजेंद्र काळे यांचा समावेश होता.

### तलवाडा मध्ये शिवजयंती...

प्राध्यापक शाम आबा कुंड म्हणजे शिंदे शिवसेनेचे नेते विठ्ठल भाऊ हाते रोशन भैया हात्ते ऋषिकेश भैया करडे सोना मोरे विशाल चिकणे गोपाल शिंदे जयराम नाटकर दत्ता महाराज शिंगणे अशोक शिंदे प्रल्हाद मरकड कृष्णा रोकडे शंकर हातागळे आकाश आहेर नारायण हजारे सभासद व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वडवणी तालुक्यात....

लॉबिंग करताना कार्यकर्ते दिसून आले आहेत. यावेळी सोमनाथराव माने, श्रीराम मुंडे, महादेवराव जमाले,सुरेश भोरे, रामेश्वर भाऊ ,प्रकाश जेधे, भास्कर उजगिरे, सुग्रीव मुंडे ,खलील पठाण, शेख अखिल भाई ,विशंभर सावंत, बापू घोलप, पठाण इम्रान, अश्विन शेळके, आत्माराम जमाले, डॉ महादेव जाधव, बाबुराव जाधव, शेख अशपाक भाई, बाबासाहेब राऊत, घाडगे सरपंच, जयदत्त खोटे, संभाजी मस्के, सुधाकर चव्हाण, पंकज धांडे, महेश सावंत, बाळासाहेब गात,राकेश बिराजदार, लालासाहेब पन्हाळे, सुरेश माने, शाम कोठुळे, सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रमजान महिन्यासाठी...

आपल्या इंद्रियांना आणि मनाला एक शुचिभरूत वळण लाभतं. मन एकाग्र करायला सुद्धा याचा फार उपयोग होतो. त्याचप्रमाणे 'इबादत' (उपासना) करण्यासाठीसुद्धा योग्य पार्श्वभूमी व मानसिकता निर्माण होते. संपूर्ण रमजान महिना हा जणू उपासनामय, प्रार्थनामय आणि भक्तिमय झालेला असतो. या महिन्यात उन्हाळा सूरू होत ऊन्हाची अधिक त्रिवता जाणवणार आहे. आस्या या भर ऊन्हाळ्यात मुस्लिम धर्मियांच्या पवित्र ऊपवासाला सुरुवात होत असुन मोठ्या प्रमाणात समाज बांधव ही उपासना पूर्ण करतात. त्यामुळे त्यांना १ महिन्यासाठी २४ तास लाईट ठेवण्यात यावी अशी मागणी रसूल शेख यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्यचे प्रशिक्षण संपन्न

## प्रवेश पूर्व शिष्यवृत्ती परीक्षेत माजलगावचा स्वराज मनोज शिनगारे दूसरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड आयोजीत शालेय स्तरावरील २०२५ या वर्षीच्या सर्वात मोठी प्रवेश पूर्व शिष्यवृत्ती परिक्षेत महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयातील इयत्ता तिसरीतील विद्यार्थी स्वराज मनोज शिनगारे याने दूसरा क्रमांक पटकावला आहे.

एकमेव शैक्षणिक संकुल म्हणून ओळख असलेले माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या १०० पैकी १०० गुणाच्या प्रवेशपूर्व शिष्यवृती परिक्षेत तालुक्यातील जवळपास २६५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यत्ता ३ री ते ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ५१ हजार रुपयांचे शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी ची हि परिक्षा आयोजीत करण्यात आली होती. चालु वर्गातील सर्व विषय व सामान्य बुद्धिमत्तेवर अधारीत तथा अतीशय पारदर्शक असलेल्या या परिक्षेत महात्मा ज्योतीबा फुले विद्यालय माजलगाव येथील तिसरी वर्गातील अतिशय होतकरू विद्यार्थी स्वराज मनोज शिनगारे याने दूसरा क्रमांक पटकावून महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालयासह माजलगाव तालुक्याच्या शिरपेच्यात भर टाकत नाव लौकिक मिळवले असता चि. स्वराज मनोज शिनगारे याचे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**गेवराई । प्रतिनिधी**



क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्यचे प्रशिक्षण दि.१९ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले.हे प्रशिक्षण छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करुन सुरु करण्यात आले. हे प्रशिक्षण संविधानिक मुल्ययांवर ,सामाजिक विषयांवर, विविध मुद्यांवर झाले.गाव पातळीवर मनरेगा अंतर्गत होणारे रोजगार हमी योजनाच्या कामा संदर्भात व विविध योजना संदर्भात चर्चा झाली.बीड जिल्ह्याच्या विविध तालुक्यातुन सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विलास मगरे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.क्रांति महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष शाहिन पठान, शेर-ए-हिंद बउसेसं ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा, विशाल वक्ते सर, रोहिणी राऊत, बाबासाहेब वसंत कोकाटे सर, कायदेशिर सल्लागार संदेश पोद्दार, गवारे पाटिल, अशोक गायकवाड, दिलीप हनुमंत पाटील, वाघमारे एस. एस, शकुंतला गुंगासे, गुलरुखजहिन रानी मॅडम, विजय माला पोद्दार, राजू मौलाना, मोहम्मद मोहसीन मौलाना, सुवर्णा मस्के, तुळसाताई शिंदे , विमलताई खोसे, प्रमोद टाकसाळ, व ईतर सर्व उपस्थित होते.

## शहाजानपूर येथील शेतकरी परमेश्वर डोईजड यांच्यावर रानडुकराने केला हल्ला

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव मतदार संघातील तिन्ही तालुक्यांमध्ये रानडुकराचे मोठ्या प्रमाणात प्रस्थ निर्माण झाले आहे रानडुकरामुळे शेतीच्या पिकाचे अतोनात नुकसान होत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी रात्री बे रात्री शेतात जावे लागते त्याप्रमाणे किसनराव डोईजड हे आपल्या शेतात गेले असता रानडुकराने त्यांच्यावर भ्याड हल्ला केला यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहे

माजलगाव तालुक्यातील शहाजानपूर गावासह परिसरात रानडुकरांनी थैमान घातले आहे गहू, ऊस,ज्वारी, हरभरा आधी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान रानडुक्कर करत आहेत म्हणून शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाऊन रात्री मी रात्री गस्त घालावी लागत आहे त्याचप्रमाणे परमेश्वर किसनराव डोईजड हे शेतकरी आपल्या शेतात रानडुकरा पासून आपल्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी गस्त घालत होते अचानक रानडुकराने त्यांच्यावर भ्याड हल्ला केला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत रानडुकरांचे वाढते थैमान कुठेतरी आवरायला हवे अशी मागणी शहाजानपुर गावकऱ्यासह परिसरातील नागरिकाकडून वन विभागाला व्यक्त केली जात आहे

## लिंबारूई येथे आज ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांचे हरीकिर्तन

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.२० फेब्रुवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून आज सायंकाळी ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांचे हरीकिर्तन होणार आहे. या सप्ताहातील आज चौथा दिवस असून रविवार दि.२३/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत महाराष्ट्रातील प्रसिध्द समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरीकिर्तन होणार आहे तरी या किर्तन सेवेचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई आणि समस्त ग्रामस्थ मंडळी यांनी केले आहे.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्ता मेळावा व सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे: सुरेश भोरे

**वडवणी । प्रतिनिधी**



शनिवार रोजी वडवणी शहरामध्ये नगरपंचायत कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या प्रमुख कार्यकर्ता मेळावा वडवणी तालुका व नूतन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन खासदार बजरंग बप्पा सोनवणे व माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते मोहनराव जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आलेले असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष सुरेश भोरे यांनी केले आहे.

## धामणगांव येथील नियमानुसार अतिक्रमण न काढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अन्याय: सामाजिक कार्यकर्ते विजय गाढवेचा आरोप

**कडा । प्रतिनिधी**

बीड अहिल्यानगर राज्य महामार्गावरील धामणगांव येथे वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे अतिक्रमण हटविण्यात आले असुन हे अतिक्रमण हटविताना नियमानुसार न हटवल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून व अधिकारी यांच्या कडून अन्याय झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विजय (आण्णा ) गाढवे यांनी केला आहे. बीड धामणगांव अहिल्यानगर राज्य महामार्गावर अनेक ठिकाणी लोकांनी अनाधिकृतपणे अतिक्रमणे केले होते.यामुळे राज्य महामार्गावर वाहतूकीस अडथळा होत असल्याने आष्टी तालुक्यातील धामणगांव ते दौलावडगांव या रस्त्यावर केलेले अतिक्रमण काढण्यात आले.अतिक्रमण केलेल्या लोकांना सूचना देऊन चूना टाकून तशी हद्द निश्चित केली आहे. कोणाचे वैयक्तिक नुकसान होऊ नये म्हणून अतिक्रमण काढण्यासाठी आठ दिवसाचा वेळ देण्यात आला होता.या कालावधीत



स्वतःहून अतिक्रमण न काढल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदरील अतिक्रमण हटविण्यात येणार होते. शनिवारी सकाळपासून अतिक्रमण काढण्यास सुरुवात झाली होती.पण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हद्दीतील जुन्या नालीलगत अतिक्रमण काढली नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी यांच्या कडून अन्याय झाल्याचा आरोप विजय गाढवे यानी केला आहे.

## जि. प. प्राथमिक शाळा मतावळी शिवजयंती साजरी

### सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन स्वराज्य शिवाजी महाराजांनी स्थापन केले : झांजे दत्ता

**बीड । प्रतिनिधी**

जि. प. प्राथमिक शाळा मतावळी शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भागवत वैद्य सं. अ. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, शाळेचे मुख्यध्यापक बन्सोडे बाळू, सहशिक्षक मेहेरकर प्रवीण, सानप सुनील, पवार राजेंद्र, लाड चंद्रकला, ठाकरे बाळासाहेब, झांजे दत्ता, गावातील नागरिक प्रकाश यादव, गीता यादव, अंगणवाडी सेविका रईस मुलानी, मदतनीस अयोध्या शेळके आदी उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बाळू बन्सोडे यांनी प्रास्ताविक करताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन पट सांगितलं, प्रमुख पाहुणे भागवत वैद्य यांनी उपस्थित विध्यार्थी यांना आय ए एस, आय पी एस अधिकारी होण्यासाठी यूपीएस सी, एम पी एस सी अभ्यासक्रमावर आधारित ध्येय प्रकाशन अकॅडेमी महाराष्ट्राची आय एम विनर परीक्षा विषय मार्गदर्शन केले.तसेंच शाळेचे विध्यार्थी श्रद्धा बांगर, प्रगती बांगर, श्रेया बांगर, प्रसाद लांडगे, कादंबरी शिकारे यांनी भाषणे केली. यावेळी सविस्तर भाषणात कादंबरी शिकारे हिने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषय माहिती देऊन उपस्तित्यांचे मने जिंकली. यावेळी सर्वोत्कृष्ट भाषण कादंबरी शिकारे हिने केल्यामुळे प्रमुख पाहुणे भागवत वैद्य यांनी ५१ रुपयांचे बक्षीस दिले.सूत्रसंचालन बाळू बन्सोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन झांजे दत्ता यांनी मानले.



## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या कार्यकारणीवर अनिल कुलकर्णी, अशोक होळकर यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या मराठवाडा प्रदेश उपाध्यक्षपदी अनिल देवा कुलकर्णी तर जिल्हाध्यक्ष म्हणून अशोक होळकर यांची नियुकती करण्यात आली आहे

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे कार्य संपूर्ण राज्यभरात असून ग्रामीण भागातील पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी संघ काम करीत आहे. केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने, प्रदेशाध्यक्ष कैलास देशमुख,यांच्या सुचनेवरून ही निवड करण्यात आली आहे. संघाच्या ध्येय धोरणानुसार काम करून संघटना वाढीसाठी आणि पत्रकारांच्या हितासाठी काम करण्याच्या सूचना या पत्रामध्ये देण्यात आल्या आहेत. या निवडीचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. तर निवडीनंतर अनिलदेवा कुलकर्णी आणि अशोक होळकर यांनी ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न शासन दरबारी मांडून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले.

## विभागीय चाचा नेहरू बाल महोत्सव स्पर्धेत दीनानाथ बालकाश्रमचा प्रथम क्रमांक

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी विभागीय चाचा नेहरू बाल महोत्सव २०२४ आयोजित करण्यात आला होता. या विभागीय स्पर्धेत दिनानाथ बालकाश्रम अंथरवण पिंपरी तांडा ता.बीड येथील कबड्डी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड झाल्याने विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करून त्यांचे कौतुक करण्यात आले. पारितोषिक वितरण प्रसंगी



संभाजीनगरच्या जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सौ. रेश्मा चिमूद्रे, विभागीय उप आयुक्त महिला बालविकास विभाग अधिकारी, सौ. हर्षा देशमुख, लेखाधिकारी श्रीमती राठोड, बालविकास अधिकारी सोपान ढाकणे, हिना भाकरे, परिविक्षा अधिकारी शिंदे, बाल विकास अधिकारी धनंजय पालवे , बालकल्याण समिती अध्यक्ष जालन्याचे राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विजयी खेळाडूंचे व त्यांना मार्गदर्शन करणारे चव्हाण बी.एल. यांचे संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशीलभाऊ पवार, सचिव अतुलभाऊ पवार.

## आष्टीत राधेश्याम भैया धस यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने उत्साहात साजरा : १३० युवकांनी केले रक्तदान

**आष्टी । प्रतिनिधी**

रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये आज काही प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी राखत व तरुणांना रक्तदानाविषयी माहिती मिळावी हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून युवा नेते तथा जामगावचे सरपंच राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.या मध्ये मोठ्या प्रमाणात तरूणांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे.




आष्टी येथील पंचायत समितीच्या प्रांगणात आयोजित युवा नेते तथा जामगावचे सरपंच राधेश्याम भैय्या धस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीराला तरूणांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. रक्तदाते यांना माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस, युवा नेते राधेश्याम भैय्या धस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी राधेश्याम भैय्या धस मित्र परिवार व नगर येथील सुरभी रक्त पेढीचे डॉ राजेंद्र पवार व विकास जरे, राहुल जरे,शिवम खिल्लारे, सोनिया शितोळे, वैष्णवी भोईटे, दिपाली वाळके, आदित्य जगताप, भावना म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.

# प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरासाठीच खर्च करावा: जिल्हाधिकारी पाठक

**बीड । प्रतिनिधी**

घर म्हणजे आपल्या हक्काच असावे अशी प्रत्येक नागरिकाची इच्छा असते पण आपल्या कुवतीप्रमाणे प्रत्येकांचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. स्वत:च्या घरात रमण्याचा आनंदच काही वेगळा असतो, कुंटूंबातील वाढत्या जबाबदा-या, मुला मुलींचे शिक्षण, लग्न इतर खर्चाने माणूस कोलमडून जातो अन् घर असावे घरासारखे हे स्वप्न सत्यात न उतरता नुसते स्वप्नच राहते, हक्काचा निवारा, घरकुल मिळवून देण्याचे काम प्रधानमंत्री अवास योजनेमूळे लाभार्थीचे स्वप्न साकार झाले असून प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरातील गृहीणीने घरासाठीच खर्च करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेच्या ४० लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीचे निधी वितरित प्रमाणपत्रा प्रसंगी काढले.





जिल्हाधिकारी श्री. पाठक म्हणाले की, शासनाचा निधी ज्या गतीने मिळतो त्याच गतीने आपण स्वत: लक्ष घालून घरकुल पूर्ण करावे, आपल्या घराची वीट आपण स्वत:च रचावी, महिलांनी या पैशाचा उपयोग इतर खर्चासाठी न करता आपल्या जवळची जमा पुंजी घरासाठी वापरुन यंदाची दिवाळी आपण आपल्या हक्काच्या घरात साजरी करावी. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. उल्हास गंडाळ, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मोकाटे आणि संबधित अधिकारी, कर्मचारी, लाभार्थी उपस्थित होते. घरकुल योजनेसाठी उत्कृष्ट काम करणा-या कर्मचा-यांचा जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रदर्शन जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांनी केले. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना 'ग्रामीण' (टप्पा – २) च्या अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्राचे वितरण तसेच १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण कळ दाबून केले.

## तलवाडा येथील ड्राव्हिंग शेत्रातील नामयुक्त लक्ष्मण साहेबराव मोरे यांचे दु:खद निधन

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ड्राव्हिंग शेत्रातील नामयुक्त व्यक्तिमत्त्व व तलवाडा येथीलच रहिवासी असणारे लक्ष्मण साहेबराव मोरे वय वर्षे ५५ यांचे कॅंसर सारख्या पण अल्पशा वाटना-या आजाराने दु:खद निधन झाले. अंत्यत मनमिळाऊ वृत्तीने गेली २५ वर्ष लक्ष्मण मोरे हे खाजगीरित्या ड्राव्हिंग शेत्रामध्ये सक्रिय होते. ड्राव्हिंग शेत्रामध्ये जागृत राहून सेवा देणारे लक्ष्मण मोरे हे व्यक्तित्व सर्व परिचित आसल्याने त्यांच्या निधनाने हळ हळ व्यक्त केल्या जात आहे. काही दिवसांपूर्वी त्यांना कॅंसरच्या आजाराने ग्रासले होते. तब्बल सहा



महिने छत्रपती संभाजी नगर येथे धुत हॉस्पिटल या ठिकाणी लक्ष्मण मोरे यांच्या वर उपचार सुरु होते. उपचार दरम्यान जरा बरे वाटल्याने त्यांना तलवाडा येथे राहत्या घरी आणले होते. परंतु दिनांक २० रोजी ▶▶ उर्वरित पान २ वर

# उदरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या जीवघेण्या कवायती ; डोंबारी खेळांकडे नागरिकांचे दुर्लक्ष

### बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची कथा आणि व्यथा वेगळीच असल्याने या समाजातील लहानग्यांना दोरी वर वेगवेगळी प्रात्यक्षिके करावयास लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत असल्याचे दाखवत असताना वास्तव वेगळेच असुन ५ ते १० वर्षाच्या कोवळ्या जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उदरनिर्वाह करत असल्याचे भयान वास्तव ग्रामीण भागात दिसून येते. शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श न झालेला हा डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेत पारंपरिक डोंबारी कला सादर करत नाच व खेळ याच संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या उदरनिर्वाह करीत आहेत. पुर्वी डोंबाऱ्याचा खेळ आला की खेळ पहायला गाव जमा व्हायचे. विविध साहसी खेळ दाखवले जायचे.खेळ झाल्यावर

▶▶ उर्वरित पान २ वर



## प्रगत तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक शेतकऱ्याच्या शेतावर राबवावे : प्रा. डॉ. इन्द्रमणि

**गेवराई । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, खामगाव ता. गेवराई जि. बीड येथे दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी ९ वी वैज्ञानिक सल्लागार समिती बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे कुलगुरू मा. डॉ. इन्द्र मणि यांची ऑनलाईन उपस्थिती होती. तसेच मा.डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक



विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी व अटारी पुणे येथील मुख्य शास्त्रज्ञ डॉ. शाकीर अली, बीड चे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मा. श्री. सुभाष साळवे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. तसेच सदरील बैठकीस डॉ वसंत सूर्यवंशी, विस्तार कृषी विद्यावेत्ता,अंबाजोगाई, डॉ. वसंत देशमुख वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख केव्हीके दिघोलांबा, कु. अश्विनी म्हस्के ता कृ अ गेवराई, सोबतच ▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य परळी तालुका अध्यक्ष पदी जयश्री माने

### पत्रकार आणि प्राध्यापक यांच्या विकास संघटनेच्या माध्यमातून करणार : जयश्री माने

**बीड । प्रतिनिधी**

परळी येथील मुकुंद ताटे यांच्या तालुका कार्यालयात काल दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष आयेशा मुलानी, प्रदेश उपाध्यक्ष साजेद सय्यद, प्रदेश कार्याध्यक्ष महिला उद्योग विकास समिती संध्या सरोदे, प्रदेश



उपाध्यक्ष वसीम आजाद, अनिस कुरेशी, रामदास तपसे, परळी तालुका अध्यक्ष मुकुंद ताटे यांनी परळी ▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा मध्ये शिवजयंती मोठ्या उत्साह मध्ये साजरी

### रक्तदान शिबिरामध्ये पोलीस अधिकारी माननीय श्री नरके साहेब यांनी रक्तदान करून घेतला सहभाग



**तलवाडा । प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत स्मृति स्थान श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये करण्यात आली आहे व शिवप्रेमी यांच्या वतीने रक्तदान शिबिर विद्युत रोषणाई व आर के ग्रुप युवराज दादा गरजे मित्र मंडळ यांच्या वतीने शिव भोजन करण्यात आले रक्तदान शिबिरामध्ये तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री सोमनाथ जी नरके साहेब यांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला आहे.व अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तलवाडा येथे राजे छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आली यावेळी तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री नरके साहेब यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली आहे.

या प्रसंगी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य सुरेश रावजी हात्ते साहेब सरपंच माननीय श्री विष्णू तात्या हात्ते शिवसेनेचे नेते गोविंद दादा जोशी माजी जिल्हा परिषद सदस्य युवराज तात्या डोंगरे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विजय डोंगरे बाबुरावजी शिगणे पत्रकार आर आर आबा पत्रकार सुभाष शिंदे पत्रकार बापू गाडेकर पत्रकार विष्णू राठोड पत्रकार अल्ताफ कुरेशी पत्रकार सुरेश गांधल ▶▶ उर्वरित पान २ वर

# जि.प.प्राथमिक शाळा, तांदळवाडी (घाट) चा वार्षिक स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे डोळ्यांची पारणे फेडणारा

**नेकनूर । प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदळवाडी घाट मध्ये दि.२०/२/२०२५ रोजी सायंकाळी वार्षिक स्नेहसंमेलनाचा बहारदार कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे उदघाटन छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे व राजमाता जिजाऊ व ज्ञानज्योती सावित्रीबाई




फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्री.राहुलजी आंधळे साहेब केंद्रप्रमुख रौळसगाव,श्री.महेशजी मोटे सर केंद्रीय मु.अ. रौळसगाव, श्री.बळीरामजी सिरसट सरपंच तांदळवाडी घाट, श्री.महादेव अण्णा खोसे उपसरपंच, श्री.पप्पूजी जगताप,श्रीम.मनीषा पप्पूजी जगताप सरपंच अंधापुरी घाट,श्री.अनिलजी खोसे ग्राम पंचायत सदस्य, श्री.शहादेव खोसे ग्रा.पं सदस्य, श्री.विजय विक्रम खोसे संचालक छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक पतसंस्था बीड, श्री.श्यामजी डाके सर मु.अ.तांदळेश्वर विद्यालय, श्रीम. शामल प्रशांत खोसे अध्यक्षा शाळा व्य.समिती तांदळवाडी घाट, श्री.नितीन सिरसट अध्यक्ष शा.व्य.स.सिरसटवस्ती, श्री.गोरख जगताप अध्यक्ष शा. व्य.स.अंधापुरी घाट, श्री.राहुल खोसे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# वडवणी तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्ष होण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये रस्सीखेस

### आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे : राजेंद्र मस्के

#### बैठकीला आले मेळाव्याचे स्वरूप

**वडवणी । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वडवणी तालुक्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक बोलण्यात आली होती, या बैठकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्षपदी



निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ कार्यक्रम माजी नगरसेवक महादेवराव जमाले पाटील यांनी आयोजित केला होता.

तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलण्यात आली होती. या बैठकीला वडवणी तालुक्यातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते, नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याने नवीन कार्यकारणी मध्ये आपल्याला स्थान मिळावे यासाठी वडवणी तालुकाध्यक्ष होण्यासाठी सहा-सात लोकांनी इच्छा व्यक्त केली आहे. या ठिकाणी बैठकीत तालुका अध्यक्ष पदासाठी आपल्याला मिळावं यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## रमजान महिन्यासाठी संपूर्ण बीड जिल्ह्यात २४ तास लाईट ठेवा : रसूल शेख

**तलवाडा । प्रतिनिधी**

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याची सुरूवात होत आहे. इस्लाम धर्मात पवित्र 'रमजान'ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात अल्लाहची विशेष इबादत (उपासना) केली जाते. मुस्लिम बांधवांकडून निरंकार रोजे (उपवास) पाळले जातात.

रोजाबरोबरच नमाज, कुराण पठण, विशेष प्रार्थना आदींमार्फत परमेश्वराची इबादत केली जाते. मुस्लिम धर्मामध्ये चांगल्या व्यक्तीला उत्तमरीत्या परिभाषित करण्यात आले आहे. यासाठी मुस्लिम असणेच पुरेसे नाही तर मुलभूत पाच कर्तव्यांचे पालन करणे आवश्यक आहे. पहिले इमान (प्रामाणिकपणा) दुसरे नमाज, तिसरे रोजा, चौथे हज आणि पाचवे जकात. इस्लाममध्ये सांगण्यात आलेले हे पाच कर्तव्य इस्लाम मानणाऱ्या व्यक्तीकडून प्रेम, सहानुभूती, मदत आणि आपलेपणाची इच्छा बाळगतात.

### रोजाचा मूळ उद्देश

रमजानमध्ये रोजा या शब्दाला आरबी भाषेत सोम म्हणतात, याचा अर्थ थांबणे. रमजानच्या पवित्र महिन्यात सर्व दिवस 'रोजा' (उपवास) करणारे सर्व 'रोजेदार' दिवसभर अन्नपाणी घेत नाहीत. यासाठी शारीरिक आणि मानसिक संयमाची फार आवश्यकता असते. त्यामुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

